रे. दि.मु.१६०/२०२० मधील नि.९४ खालील आदेश
(जुना नं. रे. दि.मु. ८२/२००७)
(CNR-**MHSN15004377-2020**)
(आनंदा पवार वि. इंदिरा पवार वगैरे ५ )

वादीने सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्र. ७ यांचे वारस अभिलेखावर घेणेकरिता झालेला विलंब माफ होऊन वारस दाव्याचे कामी रेकॉर्डवर दाखल करुन घेणेकरिता दाखल केलेला आहे.

(२) वादीचे असे कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीविरुध्द साठेखतावरुन खरेदीपत्र होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. दाव्याचे काम चालू असताना दाव्यातील प्रतिवादी क्र. ७ सुशिला मधुकर जाधव ही उचगांव, कोल्हापूर येथे दि. २५/०४/२०१९ रोजी मयत झालेली आहे. प्रतिवादी क्र. ७ सुशिला मधुकर जाधव यांचे सर्व वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ होणेकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ७ सुशिला मधुकर जाधव यांचे सर्व वारस वाटपाचे दाव्याचे कामी जरुरीचे पक्षकार आहेत. परंतु प्रतिवादींनी प्रतिवादी क्र. ७ ही मयत झालेबाबतची पुरसीस दिलेली नाही. सदरहू दाव्यातील वादीस कायद्यातील तरतूदीचे पुरेसे ज्ञान नसलेने मयत प्रतिवादीचे वारस दाव्याचे कामी मुदतीत दाखल करणेस तांत्रिकदृष्टया विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्र. ७ यांचे वारस अभिलेखावर घेणेकरिता झालेला विलंब माफ होऊन, वारस दाव्याचे कामी रेकॉर्डवर दाखल करुन घेणेत यावेत अशी विनंती केलेली आहे.

(३) प्रतिवादीतर्फे अर्जावरच म्हणणे सादर करुन वादीच्या अर्जातील सर्व कथने मान्य व कबुल नसल्याचे कथन केले आहे. वादीने जाणिपुर्वक विलंब

केला असून अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे. तसेच अर्ज मंजूर करणेचे झालेस जास्तीत जास्त कॉस्ट करावी अशी विनंती केलेली आहे.

(४) नि. १४ कडील अर्ज, त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. तसेच वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीने अर्जामध्ये नमुद केलेल्या कारणांचा विचार करता वारस अभिलेखावर घेणेकरीता झालेला विलंब हा सहा महिन्यापेक्षा जास्त आहे. प्रतिवादी क्र.७ यांच्या मृत्यूनंतर वारस रेकॉर्डवर दाखल करुन घेणे करीता झालेला विलंब माफ होऊन वारस दाखल करुन घेतलेने प्रतिवादीचे कसलेही प्रकारचे नुकसान होणार नाही. परंतु जर विलंब माफी दिली गेली नाही तर मात्र वादीचेच कायमचे नुकसान होणार आहे. सदरचा अर्ज विचारात घेता न्याय हिताच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, अनेक वाद विषय टाळण्याकरीता आणि दावा गुणदोषावर निकाली करण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

**०१.** अर्ज र. रु. २००/- (र. रु. दोनशे मात्र) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Gaurav Sadashiv Hange
Date: 2021.02.04 17:51:34 +0530

विटा.
दिनांकः-०१.०२.२०२१

( जी. एस. हांगे )
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा.
जि. सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Smt. S.P.Patil. |
| Name of the Court | : | Shri. G. S. Hange, 2nd Jt. Civil Judge J.D. & J.M.F.C., Vita. |
| Date of Decision | : | 01/02/2021 |
| Order signed by the presiding officer on | : | 04/02/2021 |
| **Order uploaded on** | **:** | **04/02/2021.** |